



# बी.ए.तृतीय वर्ष ऐच्छिक मराठी
## अभ्यासपत्रिका X
## “साहित्यविचार”





डॉ. हंसराज भोसले
महाराष्ट्र महाविद्यालय,निलंगा

अभ्यास घटक -१

👉साहित्याचे स्वरूप आणि विशेष :

- संस्कृत साहित्य परंपरा आणि साहित्य.
- साहित्य या शब्दाचा पूर्व इतिहास
- साहित्य म्हणजे सामग्री
- वांग्मय आणि साहित्य
- 
- लिखित आणि मौखिक साहित्य
- ललित साहित्य आणि शास्त्रीय साहित्य.
- ललित साहित्य म्हणजे काय? व्याख्या :



# 👉 ललित साहित्याचे स्वरूप विशेष : ✍

( संस्कृत साहित्यशास्त्रात सौन्दर्यतत्त्वाचा शोध खालील मुद्याच्या आधारे घेतला गेला आहे. )

१.अलंकार :

वामन :👉 "काव्यम् ग्राह्यम् अलंकारात्" किंवा सौन्दर्यम् अलंकार:

दण्डी :👉 "काव्यशोभाकरान् धर्मानलंकारान प्रच्यक्षते "किंवा अलंकारास्तु बाह्य शोभाकर:

२.वक्रोक्ती :

भामह :👉 "सैषा सर्वैव वक्रोक्ती:अनयार्थो विभाव्यते |
यत्नोऽस्यां कविना कार्य:ऽकोलंकारोऽनया विना ||"

***"Straight is the line of duty Curved is the line of beauty "***

कुंतक :👉 "वक्रोक्क्तिरेव वैदग्धभंगिनीभंणितिरूच्यते "

३.रीती :

वामन :👉 "रीतिरात्मा काव्यस्य, विशिष्टा पदरचना रीति :"
किंवा
👉 "काव्याशोभाया: कर्तारो धर्मा गुणा:"

## औचित्य :

- क्षेमेंद्र : ११व्या शतकात क्षेमेंद्र यांनी प्रथम हा विचार मांडला.
  "औचित्यस्य –रसजीवित भूतस्य" =रस सौन्दर्याचे जीवित.
  "उचितं प्राहुराचार्या:सदृशं किल यस्य यत् ।
  उचितस्य च यो भाव:तदौचित्यं प्रचक्षते ॥"
- आनंदवर्धन : "अनौचित्यादृते नान्यद्रसभंगस्य कारणम् ।
  प्रसिद्धोचित्यबंधस्तु रसस्योपनिषत्परा ॥"

## ध्वनी :

- आनंदवर्धन: "काव्यस्यात्मा ध्वनि :

## रसविचार :

- विश्वनाथ यांनी रसविचार मांडला पुढे भरत यांनी नाट्यशास्त्र ग्रन्थात रससूत्र सांगितले.
  **"विभावअनुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पति : "**

## ललित साहित्याच्या व्याख्या : दिनांक:13/08/2020

प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रात साहित्याला काव्य म्हटले जात असे त्यामुळे काव्य संबंधीच्या संस्कृतातील व्याख्या म्हणजे ललित साहित्याचा व्याख्या आहेत, काव्याच्या स्वरूपाचे विवेचन करताना संस्कृत परंपरेत भारतीय अद्वैत तत्वज्ञान परंपरेत शरीर व आत्मा ही परिभाषा एक रूपक म्हणून वापरलेले दिसते या रूपकाच्या आधारे काव्याचे शरीर कोणते, त्याचा आत्मा कोणता, अशा प्रकारची चर्चा अनेक संस्कृत साहित्य मीमांसकानी केलेली आहे. शरीरापेक्षा आत्मा हा महत्त्वाचा, मूलभूत स्वरुपाचा आणि माणसाचे अन्य सर्व गोष्टींपेक्षा वेगळेपण दाखविणारा घटक आहे.ते माणसाचे सत्व, स्थिरतत्व आहे, असे भारतीय ज्ञान परंपरेत मांडले आहे. काव्याचा आत्मा व सत्त्व व प्राणभूत तत्त्व कोणते याचा शोध घेण्याचा, काव्याची व्याख्या करण्याचा प्रयत्न संस्कृतमीमांसक यांनी केला आहे. या अनुषंगाने आपण संस्कृत परंपरेत अलंकार, वक्रोक्ती, रिती, औचित्य, ध्वनि आणि रस या सौंदर्य तत्वाचा शोध घेतला आहे. त्याशिवाय इतर काही व्याख्या पाहता येईल.

- १.दण्डी : "शरीरं तावद् इष्टार्थव्यवच्छिन्ना पदावली ।"

  अर्थ 👉 अर्थ सहित पदावली म्हणजे काव्य

  २.भामह "शब्धार्थो सहितौ काव्यम् ।"

  अर्थ 👉 शब्द आणि अर्थ यांचे सहितत्व म्हणजे काव्य.

  ३.जगन्नाथ " रमणीअर्थप्रतिपादक : शब्द: । रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारा शब्द.

आतापर्यंत आपण ललित साहित्याच्या अनेक व्याख्या पाहिल्या कोणतीही व्याख्या परिपूर्ण आहे असे आपल्याला म्हणता येत नाही. तरीदेखील संस्कृत अभ्यासकांनी केलेल्या व्याख्येवरून ललित साहित्याचे स्वरूप समजून घेण्यास मदत होते.त्यामुळे काही पाश्चात्त्य अभ्यासकांच्या व्याख्या देखील आपण समजून घेऊ.

४.कोलरीज: 👉 "The best words in the best order"

५.एडगर ॲलन पो : 👉 "The rhythmic creation of beauty"

६.वर्डस्वर्थ : 👉 "Poetry is the spontaneous overflow of powerful feelings, it takes its origan from emotion, recollected in transquility"

अर्थ 👉 मनाच्या शांत अवस्थेत होणारा उत्कट भावनांचा उद्रेक आविष्कार.

ही भूमिका वनस्पती घेतली आहे.

६. Macuaulay- “The art of employing words in such a manner as to produce illusion” या व्याख्येत मेकॉले ने ललित साहित्याच्या कल्पिता चा उल्लेख केलेला आहे.

७.Matthew Arnold- “Poetry is the criticism of life by gifted men” अशी सुंदर व्याख्या मॅथ्यू अरनॉल्ड यांनी केली आहे.

८.इलियट “The essenial is that each (passage)expresses in perfect languge, some permanent human impulse”

अर्थ :👉 स्थाई प्रेरणांची सर्वांग सुंदर भाषेतील आविष्कृती

इतर भारतीय अभ्यासकांची मते👉 “स्थलकाल निरपेक्षतेने सत्यज्ञान किंवा निर्भेळ आनंद देणारी भाषा म्हणजे वाङ्मय होय. श्री. कृ.कोल्हटकर.

अशी तर “कल्पनाप्राप्त जीवनप्रक्रियेची भाषाधिष्ठीत बंदिश,

गो.वी. करंदीकर.

पाश्चात्य परंपरा : वरील काही व्याख्या पाहिल्यानंतर कलावाद, जीवनवाद आणि रुपवाद या भूमिकेतून साहित्याची चिकित्सा पाश्चत्य परंपरेत केलेली दिसते.

१. कलेसाठी कला:👉 कलावाद –याचा पुरस्कर्ता अरिस्तॉटल म्हणतो त्याप्रमाणे साहित्य हे केवळ जीवनाची प्रतिकृती नसते ती सृजनशील अनुकृती असते. स्वतंत्र सृष्टीची निर्मिती असते.

२.जीवनासाठी कला:👉काव्य हा भावनेचा अविष्कार असतो. असे रोमँटिसिझम वाद्याना वाटते. उदा. वर्डस्वर्थ ची व्याख्या.

- ३.रुपवादी भूमिका : साहित्याच्या संदर्भातील हे अलौकिक रुपतत्व कोणते याबाबत रूपवादया मध्ये एकवाक्यता नाही. वेगवेगळ्या रुपवाद्यांनी यासंदर्भात वेगवेगळी रुपतत्वे मांडले आहेत. उदाहरणार्थ
- भावलेली संगती – felt harmony
- अर्थपूर्ण रूपबंध- significant form
- आशय अभिव्यक्ती –सेंद्रिय एकात्मता – organic unity
- अनेकार्थता –ambiguity
- विरोधाभास –paradox
- ताण - tension लयबद्धता इत्यादी संस्कृत परंपरेतील वक्रोक्ती, ध्वनी अशी रुपतत्वे आहेत.

- इतर विशेष :

👉 आत्मनिष्ठा/आत्मपरता 👉 कल्पितता 👉 विशिष्टता आणि सार्वत्रिकता

- 👉ललित साहित्य कल्पित आणि वास्तव :
- 👉ललित साहित्यातील अनुभव :
- 👉ललित साहित्य आणि संस्कृती :
- ललित साहित्याची पंचतत्वे :

आशतत्व ➡️ रुपतत्व ➡️भाषातत्व ➡️कल्पिततत्व ➡️ सौंदर्यतत्व

साहित्यकृती ची वाङ्मयीन महत्ता वरील पंचतत्वा वर पोसलेली असते.या तत्व पंचकात इतर आवश्यक उपतत्वाचा सेंद्रिय समावेश असतोच. साहित्यकृतीतील असे अनुभवाचे चार तत्व होय आणि साहित्यिकांचा अनुभव हा त्याच्या जीवनदृष्टीचे सारतत्व होय.

पहिली चार तत्वे सौंदर्य या पाचव्या तत्वाची सजना करतात त्याचा प्रत्यय अंतर्मुख करणारा करुणामय प्रज्ञाचा आनंदातीत प्रत्यय असतो वाचकाला येणारा हा त्याच्या मनाच्या नवनिर्माणाचा प्रत्यय असतो.

धन्यवाद !!🙏